जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUN 2025
पुण्यनगरी

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन



## अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरक : कुलगुरु

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे समग्र कार्य हे एकमेवाद्वितीय आणि प्रेरक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शनिवारी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठातर्फे डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. नीलेश शेळके लिखित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' आणि दत्तात्रय भैरवनाथ घुटुगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, दत्तात्रय घुटुगडे आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

02 JUN 2025 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेटर ते डॉक्टर हा गावडेंचा प्रेरणादायी प्रवास

## प्र–कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील यांचे प्रतिपादन : डॉ. गोपाळ गावडे यांचा सपत्निक सत्कार

**प्रतिनिधी**
चंदगड

डॉ. गोपाळ गावडेनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या जीवनात खडतर परिस्थितीत वाटचाल करून वेटर ते प्राध्यापक, डॉक्टर असा उच्चत्तम प्रवास करून शिक्षण क्षेत्रात वेगळा आदर्श निर्माण करुन त्यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे काम केले. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र – कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महावीर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सपत्नीक सत्कार समारंभानिमित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र केसरी पै. विष्णू जोशीलकर होते. यावेळी डॉ. गोपाळ गावडे यांनी लिहिलेल्या गौरव अंक आणि मराठी प्रेम कविता : अस्तित्ववादी दृष्टीकोनातूनठ 'या पुस्तकाचे प्रकाशन प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले.



**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गोपाळ गावडे व इंद्रायणी गावडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करताना प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील. सोबत पै. विष्णू जोशीलकर, मनोज जाधव आदी.**

प्र–कुलगुरू पाटील म्हणाले, एखादा प्राध्यापक, शिक्षक सेवानिवृत्त होतो, त्यावेळी समाजाला ते हानिकारक असते. चांगल्या समाजासाठी, यशासाठी ज्ञानाची नवनिर्मिती करावी लागते. ती निर्मिती गावडे सरांच्या रुपाने शिक्षण क्षेत्रात झाली आहे. माणूस कितीही मोठा झाला तरी मागे वळून पाहिले पाहिजे. गावडे सरांनी निःस्वार्थीपणे ज्ञानसंपन्न विद्यार्थी घडविले आहेत. प्राध्यापक म्हणून काम करताना घडयाळकडे पाहून काम केले नाही. म्हणून विद्यार्थांच्या विचाराना नवा आयाम देण्याचे काम त्यांच्या कडून झाले.विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची ज्योत पेटवून अनेक विद्यार्थ्यांच्या संकटात ते धावून गेले. ते समाजासाठी व विद्यार्थ्यांना आदर्शवत आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न होण्यासाठी मोलाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्र केसरी विष्णुपंत जोशीलकर यांनी चंदगड तालुक्यातील माणसं प्रामाणिक असून विविध क्षेत्रात काम करताना दिसतात. डॉ. गोपाळ गावडे यांनीही आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करून एक प्राध्यापक कसा असू शकतो, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. त्यांच्या एकूणच वाटचालीस शुभेच्छा. यावेळी महावीर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उषा पाटील, प्रा. रामचंद्र गावडे, अमेय गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. ताज मुल्लानी यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी डॉ. अरुण काकडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अरुण पाटील, डॉ. जी. पी. माळी, रामनाथ आचार्य, बाळासाहेब बांदिवडेकर, जे. बी. पाटील, भीमराव चिमणे, नागनवाडीच्या माजी सरपंच बांदिवडेकर, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, पदाधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. विनोद कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रांजली खबाले यांनी केले. आभार मनोज जाधव यांनी मानले.